| MHKO050004512019 | **समरी क्रिमिनल केस क्र.३०८/२०१९**<br>**मधील निशाणी क्र.४५ वरील आदेश**<br>**मधुसुदन कॉर्पोरेशन विरुध्द श्रावणी टेक्सटाईल्स** |
|---|---|

आरोपी यांनी सदरचा अर्ज दाखल केला असून त्या द्वारे विनंती केली आहे की, सदर प्रकरणात फिर्यादीतर्फे साक्षीदाराचा जबाब नोंदविण्यात आला असून आरोपीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्याने नो क्रॉसचा आदेश पारित झाला आहे. साक्षीदार यांचा उलटतपास नोंदविणे नैसर्गिक न्यायतत्वास आवश्यक आहे. तरी फिर्यादी साक्षीदार यांचा उलटतपास घेणेस परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केली.

२. फिर्यादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे की, आरोपी यांचा अर्ज खोटा व चूकीचा असून फिर्यादी यांना मान्य नाही. फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान तडजोडीच्या चर्चा सुरु आहेत व आरोपी यांचे कडून कागद उपलब्ध झाली नाहीत हा सदर अर्जातील मजकूर खोटा व चूकीचा आहे. तरी सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जातील नमूद कारण की, नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन संधी देण्यात यावी. सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता दोन्ही बाजूंना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. आरोपी यांनी वेळेत उलटतपास न घेतल्याने प्रकरण प्रलंबित राहिले. त्या करीता योग्य ती कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.
२. आरोपी यांनी फिर्यादी यांना रक्कम रुपये १००/- इतकी कॉस्ट दिलेनंतर सदर प्रकरणात त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी देणेत येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2023.07.11 17:01:49 +0530

**इचलकरंजी**
**दिनांकः११/०७/२०२३.**

**(एम.एम.चौधरी )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.४, इचलकरंजी**